# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने प्रशासकीय महाविद्यालय इमारत, रु.नं.१, २, ५ व ६ हजारीमल सोमानी मार्ग,
छत्रपती शिवाजी टर्मिनससमोर, मुंबई- ४०० ००१ ०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१०
E-mail : mah-sforum@nic.in Website:- www.grahak.maharashtra.gov.in

---

जा.क्र.राआ/महा./आस्था/बाहय.मनुष्यबळ पुर./निविदा/२१/ १०९४ दि - २२ मार्च, २०२१

## निविदा सूचना

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई व अधिपत्याखालील परिक्रमा खंडपीठ नागपूर व औरंगाबाद व जिल्हा ग्राहक तक्रार मंच या कार्यालयाकरीता मासिक दरावर शिपाई- ६० व रखवालदार-२ यांच्या सेवेची आवश्यकता आहे. त्यानुसार मासिक दरावर शिपाई व रखवालदार पुरविण्याबाबत निविदाधारकांकडून व्दि (Double)लिफाफा पध्दतीने ११ महिन्याकरीता तांत्रिक व आर्थिक निविदा मागविण्यात येत आहे.

उदयोग, उर्जा व कामगार विभागाच्या क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग III/उदयो ४, दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने भरावयाच्या निविदा शुल्क ना-परतावा (Tender fee-Non refundable) आणि बयाणा रकमेचा तपशिल दिलेला असून त्यानुसार रु. १,१६,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी सोळा लाख) अंदाजित किंमतीसाठी स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने रु. १०,०००/- Tender fee आणि रु. १,००,०००/- बयाना रक्कम (EMD {INR})यांचा भरणा करणे आवश्यक राहील.

सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदा ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. यासंदर्भात https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर सूचना व विहित नमुन्यातील अर्ज प्रसिध्द करण्यात आला असून निविदाधारकांकडून महाराष्ट्र शासन, उद्योग व कामगार विभाग अधिसूचना दिनांक २४, जुलै २०१९ च्या अनुषंगाने कामगारांना निर्धारित केलेल्या वेतनाचे किमान दराच्या अधिन राहून खाली नमूद केलेल्या कालावधीत online निविदा अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्राप्त झालेल्या निविदापैकी कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता फेटाळण्याचे अधिकार मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई राखून ठेवत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | सेवेचा कालावधी | ११ महिने |
| २ | निविदा फॉर्म स्विकारण्याची तारीख | ३०/०३/२०२१ सकाळी १०.०० वाजता पासून दि. १५/०४/२०२१ सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत |
| ३ | प्री-बिड बैठक | दि.१२/०४/२०२१ दुपारी ३.०० वाजता (वरील नमुद कार्यालयीन पत्त्यावर) |
| ४ | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख व वेळ | १५/०४/२०२१ सायंकाळी ५.३० वाजता |
| ५ | तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक | १९/०४/२०२१ सकाळी ३.०० वाजता किंवा राज्य आयोगाचे कार्यालय ठरवेल त्याप्रमाणे |
| ६ | आर्थिक निविदा उघडण्याची तारीख व वेळ | २२/०४/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.प्रबंधक (प्रशासन), राज्य आयोग, मुंबई यांचे दालनात किंवा तांत्रिक निविदा उघडल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर |

सदर ई-निविदा करीता www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर विहित नमुन्यातील अर्ज प्रसिध्द करण्यात आला असून, ई-निविदा प्रकियेबाबतची संपूर्ण माहिती tender document मध्ये स्वतंत्र्यरित्या देण्यात आलेली आहे.

Sd/-

(एम.पी.भावसार)
प्रबंधक (प्रशासन)
राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग
महाराष्ट्र, मुंबई

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई व त्यांच्या अधिपत्याखालील परिक्रमा खंडपीठ नागपूर व औरंगाबाद आणि जिल्हा ग्राहक मंच कार्यालयात मासिक दरावर ११ महिन्याकरीता शिपाई - ६०, रखवालदार - २ अशी एकूण ६२ पदांसाठी मनुष्यबळ पुरविण्याबाबत मनुष्यबळ पुरवठा धारक संस्थांकडून ई निविदा मागविण्यात येत आहेत. त्यासंबंधीच्या संस्थेस लागू असलेल्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :-

## तांत्रिक निविदा

१. उद्योग विभागाच्या शासन निर्णय क्रमांक भांखस २०१४/प्र.क्र.८२/भाग III/उद्योग ४, दिनांक १/१२/२०१६ आणि त्यासोबत संलग्न सुधारित नियमपुस्तिका यामध्ये विविध नियमांतर्गत तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असुन त्याचा संकेतांक क्रमांक २०१६१२०२१७०८२६९५१० हा आहे.

२. सदर शासननिर्णयातील नियम क्रमांक ६ अंतर्गत परिशिष्ट ६.८ मध्ये स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने भरावयाच्या निविदा शुल्क ना-परतावा (Tender fees — Non Refundable) आणि बयाणा रकमेचा तपशिल दिला असून त्यानुसार रु.१.१६,००,०००/- अंदाजित किंमतीसाठी स्पर्धेत भाग घेणा-या निविदाकाराने र.१०,०००/- निविदा शुल्क (Tender Fee) आणि बयाणा रक्कम रु.१,००,०००/- नियमाप्रमाणे निवादाधारकास भरणा करणे आवश्यक राहील. बयाणा रक्कम भरण्यापासून विहीत निकषानुसार सूट असल्यास त्याबाबतचे नजिकच्या काळातील सक्षम प्राधिका-यांचे प्रमाणपत्र संबंधित निविदाकाराने निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

३. सदर शासननिर्णयातील नियम क्रमांक ४.६ अनुसार यशस्वी निविदाकारास सन -२०२१-२०२२ या वर्षाकरीता खरेदी प्राधिका-याकडे आदेशाच्या अंदाजित सेवा मुल्याच्या (एकूण रकमेच्या) ३ टक्के रक्कम अनामत ठेव डिमांड ड्रॉफ्टद्वारे अथवा राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीद्वारे ११ महिन्याच्या मुदतीसाठी विहीत नमुन्यात सदर शासन निर्णयातील (परिशिष्ट १० नुसार) निविदा स्विकृतीच्या आदेशापासून १५ दिवसांचे आत सुपूर्द करणे आवश्यक आहे. मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी करारनामा ११ महिन्यासाठी गैरन्यायिक १०० रुपयाच्या स्टँपपेपरवर करणे आवश्यक आहे. स्टँपपेपरचे शुल्क निविदाकारास अदा करावे लागेल.

४. आस्थापना व दुकाने अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या परवान्याची प्रत आवश्यक

५. निविदेच्या अंतिम तारखेपर्यत ग्राहय असलेले आयकर भरल्यासंबंधीच्या प्रमाणपत्राची प्रत तसेच मागील ३ वर्षाची आयकर विवरणपत्रे व पॅनकार्ड ची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील.

६. निविदाकाराचे नाव काळया यादीत नसल्याचे व निविदेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रु. १००/- चे बॉण्ड पेपरवर स्वप्रमाणित करणे आवश्यक आहे.

७. जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राची प्रत व जीएसटी भरल्याचे विवरणपत्र तसेच वर नमूद केलेल्या आवश्यक कागदपत्रांमध्ये शासनास आवश्यक वाटल्यास अधिक कागदपत्रांची तसेच मूळ कागदपत्रांची मागणी करण्यात येईल व निविदाकारास मागणीनुसार ती कागदपत्रे पडताळणीकरीता दाखविणे बंधनकारक राहील.

८. शिपाई/रखवालदार पदासाठी कर्मचारी उपलब्ध करुन देणेसाठी संस्थेकडे पुरेसे मनुष्यबळ असणे आवश्यक आहे.

९. मागील ३ वर्षाची संस्थेची उलाढाल ( Turn Over) रक्कम रुपये १० लाख किंवा त्याच्यापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. याकरीता मागील ३ वर्षाचे इन्कम टॅक्स रिटर्न जोडावीत.

१०. शासनाला मनुष्यबळ पुरविण्यासाठीचा संस्थेकडे असलेला अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच संस्थेने एका आस्थापनेवर किमान २० कर्मचारी (मनुष्यबळ) पुरविलेले असणे आवश्यक आहे.

११. मागील ३ वर्षाच्या कालावधीत संस्थेने ज्या कार्यालयांसाठी मनुष्यबळाचा पुरवठा केला आहे. त्या कार्यालयांचा पत्ता व सविस्तर तपशील देणे बंधनकारक राहील.

१२. संस्थेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येणा-या कर्मचा-यांचा अनुभव आणि त्यांची शैक्षणिक अर्हता दाखविणारे कागदपत्रे दाखल करावीत.

१३. निविदाधारक किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी निविदा उघडण्याच्या वेळी सर्व माहितीसह हजर राहू शकतील.

१४. निविदेतील अटी, शर्ती याबाबत व निविदा स्विकारणे अथवा नाकरण्याचा हक्क या कार्यालयाने राखून ठेवला आहे. तसेच निविदेमध्ये नमुद केलेलया अटी व शर्ती रदद करणे किंवा भर घालणे याबाबतचा अधिकार मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या कार्यालयास आहे.

१५.निविदेसोबत स्कॅन केलेली कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. Technical Bid उघडताना स्कॅन केलेली मूळ कागदपत्रे व कागदपत्रांची साक्षांकित प्रत तपासणीसाठी या कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

१६. Online ई निविदाखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे निविदा स्विकारल्या जाणार नाहीत.

१७. इसारा रक्कम भरण्यापासून सूट असल्यास त्याबाबतचे सक्षम प्राधिका-याचे कागदपत्राची स्कॅन कॉपी अपलोड करणे आवश्यक आहे.

१८. निविदा स्विकृत केलेल्या निविदाधारक यांना निविदेतील मनुष्यबळाची मागणी या कार्यालयाच्या गरजेनुसार व निकडीनुसार करावी लागेल. पुरवठा केलेले मनुष्यबळ योग्य दर्जाचे नसल्याचे या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास, सदर दरकरार कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येईल.

१९. स्विकृत केलेले निविदाधारक हे नियम व अटीनुसार करार पूर्ण करू शकत नसल्याचे दिसून आल्यास त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२०. निविदेतील दर हे निविदा स्विकृतीनंतर ११ महिन्यासाठी अस्तित्वात राहतील. सदर दर अकरा महिन्यांसाठी किंवा पुढील करार होईपर्यंत कायम राहतील. सदर करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अथवा त्यास मुदतवाढ देण्याचा अधिकार मा.अध्यक्ष,राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,मुंबई यांना राहील.

२१. नियमित स्वरुपातील मनुष्यबळ उपलब्ध होताच त्या दिवसापासून निविदा धारकाबरोबर केलेला करार संपूष्टात येईल.

२२. निविदाकारांनी मागणीनुसार मूळ कागदपत्र तपासणीसाठी सादर न केल्यास अथवा अपूर्ण सादर केल्याचे आढळल्यास किंवा अपलोड केलेल्या प्रती व मूळ प्रती यामध्ये फरक आढळल्यास सदर निविदा, निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल. तसेच निविदाकाराने ज्या नावाने निविदा सादर केली आहे. त्याच नावाची कागदपत्रे असणे आवश्यक आहे.

२३. तांत्रिक व आर्थिक या दोन्ही निविदा Online ई निविदे द्वारेच सादर करणे आवश्यक राहील.

२४. तांत्रिक निविदा Online उघडताना निविदाकार किंवा त्यांनी लेखी पत्रान्वये प्राधिकृत केलेला प्रतिनिधी दिनांक १९/०४/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे कार्यालयात उपस्थित राहू शकतात.

२५. तांत्रिक निविदा Online उघडण्यात येतील व त्या उघडल्यानंतर त्यांची छाननी करुन पात्र व अपात्र निविदाकार विभागण्यात येतील. त्यानंतर अपात्र उमेदवारांच्या निविदा Online च नाकारण्यात येतील.

२६. त्यानंतर दिनांक २२/०४/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता पात्र निविदाकारांच्या आर्थिक निविदा Online उघडण्यात येतील. तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाकारांनी आर्थिक निविदा Online उघडताना दिनांक २२/०४/२०२१ रोजी दुपारी ३.०० वाजता मा.अध्यक्ष, राज्य आयोग, मुंबई यांचे कार्यालयात उपस्थित रहावे.

२७. काही अपरिहार्य तसेच तांत्रिक कारणांमुळे ई-निविदा प्रक्रियेतील वेळापत्रकात बदल केला जाऊ शकतो. त्याबाबतच्या सूचना कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व ऑनलाईन प्रदर्शित करण्यात येतील.

२८. शिपाई/रखवालदार वर्ग-४ चे कर्मचा-यांचा महाराष्ट्र राज्यातील मुंबई व जिल्हास्तरावर पुरवठा करणे आवश्यक आहे.(मनुष्यबळ पुरवठा करण्याकरीता कार्यालयांची यादी सोबत जोडली आहे.)

२९. शिपाई/रखवालदार भारतीय असावा, त्यास मराठी लिहिता/वाचता/बोलता येणे आवश्यक आहे.

३०. शिपाई/रखवालदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.

३१. संस्थेतर्फे पुरविण्यात येणारे शिपाई/रखवालदार गुन्हेगारी पार्श्वभूमीचे/प्रवृत्तीचे नसावेत.

३२. संस्थेने पुरविलेल्या शिपाई/रखवालदार कर्मचा-याने असभ्य वर्तणूक केल्यास, तो वारंवार गैरहजर राहिल्यास अशा कर्मचा-यांऐवजी अन्य कर्मचारी उपलब्ध करुन देणे संस्थेस बंधनकारक राहिल.

३३.निविदा सादर केल्यानंतर चुका/गैरसमजुती इ.सारख्या कोणत्याही कारणास्तव दरांमध्ये कोणतेही बदल करण्यास परवानगी देण्यात येणार नाही.

३४.यशस्वी निविदाधारका सोबत करण्यात येणा-या करारामध्ये सदर अटी/शर्ती व सूचना यांचा समावेश असेल.

३५. प्रत्येक निविदाधारकाने काळया यादीतील कंत्राटदाराशी संबंध नाही त्याबाबत लेखी नमूद करणे आवश्यक आहे.

३६.सदर कामाची निविदा कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयाने राखून ठेवले आहे.

३७.निविदेतील दर ११ महिन्यासाठी अस्तित्वात राहतील. सदर करार केव्हाही संपुष्टात आणण्याचा अथवा मुदतवाढ देण्याचा अधिकार मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांना राहिल.

३८. वरील कामांचा ई-निविदा सूचना या कार्यालयाच्या www.grahak.maharashtra.gov.in या वेबसाईटवर सुध्दा उपलब्ध आहे.

३९. सदर निविदा प्रक्रिया दोन लिफाफा (Double)पध्दतीची राहील. तथापि तांत्रिक निविदासंदर्भात ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रांचा एक संच (Hard Copy) तांत्रिक निविदा उघडण्याच्या वेळी सादर करावा लागेल. सदरचा संच प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार आयोग, महाराष्ट्र, मुंबई यांचे कार्यालय, जुने प्रशासकीय महाविदयालय, खोली क्र. १,२,५ व ६, हजारीमल सोमानी मार्ग, मुंबई — ४०० ००१ या पत्त्यावर पाठविण्यात यावा.

४०. जे निविदाकार तांत्रिकरित्या अपात्र ठरतील त्यांची अनामत रक्कम त्यांना अपात्र ठरविल्यापासून दोन आठवडयात परत करण्यात येईल. तसेच जे निविदाकार तांत्रिकरित्या पात्र ठरलेले आहेत त्यांची अनामत रक्कम यशस्वी निविदाकारांची निवड झाल्यानंतर परत करण्यात येईल. मात्र यशस्वी निविदाकारास अनामत रकमेची बॅक गॅरंटी ११ महिन्यासाठी या कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

४१.सदर निविदा दरपत्रकासंदर्भात काही वाद उदभवल्यास न्यायालयीन कार्यक्षेत्र मुंबई शहर राहील.

४२. जर एखादया निवादाकाराला दुस-या निविदाकाराबाबत तक्रार करावयाची असल्यास, तक्रारी सोबत रु. १,००,०००/- डिपॉझिट ठेवणे आवश्यक आहे. सदर डिपॉझिट प्रबंधक (प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण

आयोग,मुंबई यांचे नावाने Demand Draft व्दारे जमा करणे आवश्यक आहे. सदर चे प्रकरण सर्व वस्तुस्थितीसह मा.अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई यांचे पुढे सादर करण्यात येईल. तक्रारीत तथ्य आढळल्यास डिपॉझिट रक्कम विनाव्याजाने परत करण्यात येईल, परंतु तक्रार खोटी किंवा तक्रारदार अप्रामाणिक आढळल्यास सदर तक्रारदाराला (निविदाकाराला) डिपॉझिट रक्कम गमावावी लागेल.

४३. अनामत रक्कम बॅक गॅरंटीच्या स्वरुपात प्रबंधक(प्रशासन), राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे नावाने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेव्दारे दयावी लागेल.

४४. अनामत रक्कम कराराचा कालावधी संपल्यापासून ६० दिवसानंतर पुरवठादारास परत करण्यात येईल.

४५. निविदेतील अटी व शर्तीनुसार पुरवठादार पुर्तता करण्यास असमर्थ ठरल्यास पुरवठादारास अनामत रक्कम गमवावी लागू शकते.

४६. शिपाई व रखवालदार ही पदे या कार्यालयाच्या सेवाप्रवेश नियमानुसार समकक्ष असल्यामुळे निविदा सादर करताना शिपाई व रखवालदाराचा मोबदला समान राहील.

४७. पुरवठा केलेल्या संबंधित कर्मचा-याच्या चुकीमुळे पुरवठा करण्यात आलेल्या कार्यालयास नुकसान झाल्यास सदर नुकसान भरपाईची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

४८. सेवापुरवठादाराने कंत्राटी कर्मचारी पुरविल्यानंतर त्याबाबतचा मोबदला हा सेवापुरवठादाराने त्याबाबतचे देयक व हजेरीपत्रक सेवा पुरविण्यात आलेल्या कार्यालयास सादर केल्यानंतर, सदर कार्यालयाकडून मासिक तत्वावर अदा करण्यात येईल. सेवापुरवठादारास मोबदला देण्यास कोणत्याही कारणास्तव उशीर झाला तर त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय राहणार नाही.

४९. शिपाई व रखवालदार यांना निर्धारीत करण्यात आलेले वेतन महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग यांचे दिनांक २४/०७/२०१९ च्या अधिसूचनेप्रमाणे वेतनाचे किमान दराप्रमाणे असणे आवश्यक आहे.

प्राप्त दरपत्रक उघडण्याची तारीख व वेळ www.mahatenders.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध होईल. सदर माहितीचे अवलोकन करण्याची जबाबदारी निविदाकाराची राहील. दरपत्रक निविदा उघडतेवेळी निविदाधारक किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

दिनांक ःः २२/०३/२०२१

Sd/-

(एम.पी.भावसार)

प्रबंधक (प्रशासन)

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग

महाराष्ट्र, मुंबई

# शिपाई/रखवालदार संख्या व नेमणूकीचे ठिकाण

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | पदांची संख्या व ठिकाण् | |
|---|---|---|---|
| | | शिपाई | रखवालदार |
| १ | राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई | २ | --- |
| २ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, दक्षिण मुंबई | २ | --- |
| ३ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, मध्य मुंबई | १ | --- |
| ४ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, मुंबई उपनगर | १ | --- |
| ५ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, ठाणे | १ | --- |
| ६ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अति. ठाणे | १ | --- |
| ७ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, रायगड | २ | --- |
| ८ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, रत्नागिरी | २ | --- |
| ९ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, सिंधुदूर्ग | १ | --- |
| १० | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, पुणे | २ | --- |
| ११ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, पुणे अतिरिक्त | २ | --- |
| १२ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, सातारा | २ | --- |
| १३ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर | २ | --- |
| १४ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, सोलापूर | २ | --- |
| १५ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, सांगली | १ | --- |
| १६ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नाशिक | १ | --- |
| १७ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, जळगांव | २ | --- |
| १८ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नंदुरबार | १ | --- |
| १९ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, धुळे | २ | --- |
| २० | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अमरावती | २ | --- |
| २१ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अकोला | २ | --- |
| २२ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, वाशिम | २ | --- |
| २३ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, यवतमाळ | १ | --- |
| २४ | राज्य आयोगाचे नागपूर परिक्रमा खंडपीठ.नागपूर | १ | १ |
| २५ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नागपूर अति. | ३ | --- |
| २६ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, भंडारा | २ | --- |
| २७ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, गोंदिया | २ | --- |
| २८ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, चंद्रपूर | १ | --- |
| २९ | राज्य आयोगाचे परिक्रमा खंडपीठ औरंगाबाद | १ | १ |
| ३० | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, हिंगोली | २ | --- |
| ३१ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नांदेड | २ | --- |
| ३२ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,उस्मानाबाद | २ | --- |
| ३३ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, बीड | २ | --- |
| ३४ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, परभणी | १ | --- |
| ३५ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, लातूर | २ | --- |
| ३६ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, नागपूर | १ | |
| ३८ | जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मच, वर्धा | १ | |
| | एकूण | ६० | २ |

लिफाफा नं-१ मधील आवश्यक कागदपत्रे

१) निविदा फार्म
२) निविदा फी व EMD पावती
३) निविदा साठी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधी किवा जबाबदारी व्यक्तीचे प्राधिकारपत्र
४) वार्षिक उलाढालीबाबत चार्टड अकाऊन्टट चे प्रमाणपत्र व आयकर रिटर्न्सच्या प्रती
५) मागील तीन वर्षाचा लेखापरिक्षकाकडून लेखापरीक्षण झालेला लेखा अहवाल
६) जीएसटी नोंदणीबाबतचे प्रमाणपत्र
७) गैरन्यायिक स्टॅम्पपेपर वर प्रतिज्ञापत्र
८) निविदाधारकाबाबतची संपूर्ण माहिती
९) इतर विभागात मनुष्यबळ पुरवठा केला असल्यास, सदर आदेशाच्या प्रती

लिफाफा क्र.२ मधील आवश्यक कागदपत्रे

१) निविदेतील किंमत बोली (Price Bid)